18 MAY 2010
जिल्हाधिकारी कार्यालय, ...
नोंदणी ...


प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र निर्गमित
करण्यासाठी निकष ठरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक - आरपीए-०६०९/प्र.क्र.२००/र-१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - ३ / ५/२०१०.

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एईएम १०८०/३५/१६-अ, दिनांक २१/१/१९८०
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.आरपीअे २००६/प्र.क्र.१(३)/र-१, दिनांक १७/४/२००६
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.आरपीअे २००६/प्र.क्र.१(४)/र-१, दिनांक १७/४/२००६
४) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.आरपीअे २००७/प्र.क्र.२९३/र-१, दिनांक २७/३/२००८.

प्रस्तावना :-

प्रकल्पामुळे बाधित होणा-या व्यक्तींना शासकीय / निमशासकीय सेवेतील गट "क"व गट "ड" च्या सरळ सेवेतील ५ टक्के जागांवर भरतीत सर्वोच्च प्राधान्य देण्याची योजना आहे. ज्या प्रकल्पग्रस्तांच्या जमीनी अथवा घरे बाधित क्षेत्रात संपादित झाली आहेत, अशा व्यक्तींना किंवा त्यांच्या नामनिर्देशित व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यात येते. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे नोंदवही ठेवण्यात येते. नियुक्ती प्राधिका-यांच्या मागणीनुसार त्यांची नावे नियुक्ती प्राधिका-यांकडे पाठविण्यात येतात.

बाधित परिमंडळात किती जमीन संपादित झाल्यास प्रकल्पग्रस्तांना शासकीय / निमशासकीय सेवेत नोकरीसाठी ५ टक्के जागावर सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे, याबाबत निकष किंवा मार्गदर्शक तत्व विहित केलेले नाही. अशाप्रकारचे मार्गदर्शक तत्व विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासन याव्दारे असा निर्णय घेण्यात येत आहे की, प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रात ज्या प्रकल्पग्रस्ताची किमान २० आर. जमीन संपादित झाली आहे, आणि शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. आरपीए -२००६ / प्र.क्र.१ (३) / र-१, दिनांक-१७/४/२००६ आणि शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.आरपीए-२००६/प्र.क्र. १(४)/र-१,दि.१७/४/२००६ नुसार प्रकल्पग्रस्तांच्या मालकीची १०० टक्के जमीन भूसंपादन अधिनियमानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ

संपादीत झाल्यास व संपादनानंतर त्यांच्या मालकीची राज्यात वा शेजारच्या राज्यात जमीन नसेल असे प्रतिज्ञापत्र त्याने दिले तरच अशा प्रकल्पग्रस्त कुटूंबातील एका व्यक्तीच्या नावे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एईएम-१०८०/३५/ १६-अ, दि.२१/१/१९८० नुसार नोकरीसाठीचे प्रमाणपत्र देय असेल.

तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ भाग १ (१०) (तीन) नुसार पुढील प्रमाणे निर्वाहक क्षेत्र शिल्लक असल्यास -

(१) कोरड वाहू पिकांच्या किंवा जिराईत जमिनीच्या बाबतीत ६.४७ हेक्टर किंवा

(२) हंगामी ओलीताच्या जमिनीच्या किंवा साळीच्या किंवा भाताच्या जमिनीच्या बाबतीत ३.२४ हेक्टर, किंवा

(३) बागायती किंवा बारमाही ओलीताच्या जमिनीच्या बाबतीत १.६२ हेक्टर्स निर्वाहक क्षेत्र शिल्लक असल्यास त्या जमीनधारकाची प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात कितीही जमीन संपादीत झाली असली तरी त्यांस शासकीय / निमशासकीय सेवेत नोकरीसाठी प्रमाणपत्र देऊ नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( भा.र. गावित)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव , मंत्रालय, मुंबई-३२
मा. मंत्री ( म व पु ) यांचे खाजगी सचिव , मंत्रालय, मुंबई-३२
मा. राज्यमंत्री, ( म. व पु. ) यांचे खाजगी सचिव , मंत्रालय, मुंबई-३२
मंत्रालयीन सर्व विभाग
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व उपायुक्त (पुनर्वसन) विभागीय आयुक्त कार्यालय.
सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी
सर्व सह सचिव/उप सचिव/वि.का.अ./ अवर सचिव / कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती र-१ कार्यासन

33
29/5/2010

D:\backup d;\U.S.DICN / Dicn.G.R.R-1.lwp /

एच-९३२-१३अ